# सराव प्रश्नपत्रिका

**विषय : इतिहास व राज्यशास्त्र** **गुण : ६०**

**इयत्ता : १० वी** **वेळ : २.३० तास**

**सूचना :**

(१) सर्व कृती/प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(२) उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतीचे पूर्ण गुण दर्शवतात.

(३) प्रश्न क्र. १ ते ५ इतिहास व प्रश्न क्र. ६ ते ९ राज्यशास्त्र या विषयांवरील आहेत.

(४) प्रश्न १ (अ) मध्ये संपूर्ण विधान लिहिणे आवश्यक आहे.

(५) प्रश्न १ (ब) मधील प्रत्येक संचातील पहिला घटक तसाच ठेवून दुसऱ्या घटकाची दुरूस्ती करणे अपेक्षित आहे.

(६) प्रश्न २ (अ)मधील दिलेले संकल्पना चित्र त्यात नमुना आराखड्यानुसार पेनने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

---

**प्र. १ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा.** **(गुण ४)**

(१) रिझन इन हिस्टरी हा ग्रंथ .................... यांनी लिहिला.

अ) रेने देकार्त ब) मायकेल फुको

क) जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल ड) कार्ल मार्क्स

(२) 'हितोपदेश' या संस्कृत ग्रंथाचा जर्मन भाषेत अनुवाद ............... यांनी केला.

अ) जेम्स मिल ब) फ्रेडरिक मॅक्सम्युलर

क) माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन ड) जॉन मार्शल

(३) भारतीय मूर्ती विज्ञानाचा पाया ............... शैलीने घातला गेला.

अ) नागर ब) द्राविड

क) गांधार ड) मथुरा

(४) महाबळेश्वर जवळील भिलार हे ............... गाव म्हणून प्रसिद्ध आहे.

अ) पुस्तकांचे ब) वनस्पतींचे

क) आंब्यांचे ड) किल्ल्यांचे

**(ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.** **(गुण ४)**

(१) i) राष्ट्रवादी इतिहासलेखन – स्वा.वि.दा.सावरकर

ii) मार्क्सवादी इतिहासलेखन – दामोदर धर्मानंद कोसंबी

iii) वंचितांचा इतिहास – रामचंद्र गुहा

iv) स्त्रीवादी इतिहास – शर्मिला रेगे


(२) i) कुटियट्टम - केरळमधील संस्कृत नाट्यपरंपरा
ii) रम्मन - पश्चिम बंगालमधील नृत्य
iii) रामलीला - उत्तर भारतातील नृत्य
iv) कालबेलिया - राजस्थानचे लोकसंगीत आणि लोकनृत्य

(३) i) वाई सातारा येथील जुन्या वाड्यातील भित्तिचित्रे - मराठा चित्रशैली
ii) मध्यप्रदेशातील भीमबेटका येथील गुहाचित्रे - लोकचित्रकला शैली
iii) रामायण, महाभारतातील कथा सांगण्याची परंपरा - चित्रकथी परंपरा
iv) सवाई माधवराव व नाना फडणवीस यांचे चित्र - मुघल लघुचित्रशैली


(४) i) महाराज सयाजीराव विद्यापीठ - दिल्ली
ii) बनारस हिंदू विद्यापीठ - वाराणसी
iii) अलिगढ मुस्लीम युनिव्हर्सिटी - अलिगढ
iv) जिवाजी विद्यापीठ - ग्वालियर

**प्र. २ (अ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (कोणतेही २)** **(गुण ४)**

**(१) दिलेले संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**(२) दिलेले संकल्पनाचित्र पूर्ण करा.**



(३) पुढील तक्ता पूर्ण करा.

| | भजन | ललित |
|---|---|---|
| गुणवैशिष्ट्ये | ----------- ----------- | ----------- ----------- |
| उदाहरणे | ----------- ----------- | ----------- ----------- |

**प्र.२ (ब) टीपा लिहा. (कोणत्याही २)** **(गुण ४)**

(१) वर्तमानपत्रांचे स्वातंत्र्यसंग्रामातील कार्य

(२) सरस्वती महाल ग्रंथालय

(३) क्रीडा पर्यटन

**प्र. ३ (अ) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतेही २)** **(गुण ६)**

(१) बखर हा ऐतिहासिक साहित्यातील महत्वाचा प्रकार आहे.

(२) जागतिक वारशाच्या पदास पात्र ठरणारी स्थळे, परंपरा यांची यादी युनेस्कोद्वारे जाहीर केली जाते.

(३) वर्तमानपत्रांना इतिहास या विषयाची आवश्यकता असते.

(४) सध्याच्या काळात खेळाचे अर्थकारण बदलले आहे.

(५) आपण आपला नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा जपला पाहिजे.

**प्र.३ (ब) पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही २)** **(गुण ६)**

(१) वंचितांच्या इतिहासातून सर्वसामान्य माणसाच्या जीवनाचे चित्रण केले गेले, तुमचे मत लिहा.

(२) उपयोजित कलाक्षेत्रात कोणकोणत्या गोष्टींचा समावेश होतो?

(३) सांस्कृतिक वारसास्थळांच्या यादीत समाविष्ट असलेल्या महाराष्ट्रातील ठिकाणांची नावे सांगून कोणत्याही एका ठिकाणाविषयी माहिती लिहा.

**प्र. ४ दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(गुण ४)**

महाराष्ट्रातील रंगभूमीच्या विकासात १९व्या शतकाचे स्थान महत्वाचे आहे. विष्णुदास भावे मराठी रंगभूमीचे जनक म्हणून ओळखले जातात. 'सीतास्वयंवर' हे त्यांनी रंगभूमीवर आणलेले पहिले नाटक होय. विष्णुदास भाव्यांनी लिहिलेल्या नाटकांनंतर महाराष्ट्रात ऐतिहासिक, पौराणिक नाटकांबरोबरच हलक्याफुलक्या पद्धतीची प्रहसन प्रकारातील नाटकेही रंगभूमीवर आली. त्यामध्ये विनोदी पद्धतीने सामाजिक विषय सादर केले जात.

सुरुवातीच्या नाटकांच्या संहिता लिखित स्वरूपात नसत. बऱ्याचदा त्यातील गीते लिहिलेली असली तरी गद्य संवाद उत्स्फूर्त स्वरूपाचे असत. मुद्रित स्वरूपात संहिता उपलब्ध असणारे पहिले नाटक वि.ज.कीर्तने यांनी १८६१ साली लिहिलेले 'थोरले माधवराव पेशवे' हे होय. या नाटकामुळे संपूर्ण लिखित संहिता असलेल्या नाटकांची नवी परंपरा सुरू झाली.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या पर्वात उत्तर हिंदुस्थानातील ख्याल संगीत महाराष्ट्रात रुजवण्याचे काम बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांनी केले. त्यांच्यानंतर उस्ताद अल्लादियाँ खाँ, उस्ताद अब्दुल करीम खाँ आणि उस्ताद रहिमत खाँ यांनी महाराष्ट्रातील रसिकांमध्ये संगीताची आवड निर्माण केली. त्याचा परिणाम होऊन संगीत रंगभूमीचा उदय झाला. किर्लोस्कर मंडळी या नाटक कंपनीची संगीत नाटके लोकप्रिय झाली. त्यामध्ये 'संगीत शाकुंतल' हे अण्णासाहेब किर्लोस्करांनी लिहिलेले नाटक अतिशय गाजले. संगीत नाटकांमध्ये गोविंद बल्लाळ देवल यांनी लिहिलेले 'संगीत शारदा' हे नाटक अत्यंत महत्त्वाचे आहे. या नाटकात जरठकुमारी विवाह या तत्कालीन अनिष्ठ प्रथेवर विनोदी पद्धतीने परंतु मार्मिक टीका केली आहे. याखेरीज श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे 'मूकनायक', कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे 'संगीत मानापमान', राम गणेश गडकरी यांचे 'एकच प्याला' ही नाटके रंगभूमीच्या इतिहासात महत्त्वाची आहेत.

(१) सीतास्वयंवर हे नाटक रंगभूमीवर कोणी आणले? (१)

(२) संगीत शारदा या नाटकाचे लेखक कोण होते? (१)

(३) नाटक सामाजिक प्रबोधन कसे घडवून आणते हे स्पष्ट करा. (२)

**प्र. ५ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही २) (गुण ८)**

(१) कार्ल मार्क्स यांचा वर्गसिद्धांत स्पष्ट करा.

(२) मैदानी खेळ व बैठे खेळ यांच्याविषयी माहिती लिहा.

(३) अभिलेखागाराच्या व्यवस्थापनात कोणती कामे महत्त्वाची आहेत?

(४) कलाक्षेत्रात व्यवसायाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत हे स्पष्ट करा.

## राज्यशास्त्र

**प्र.६ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय लिहा. (गुण ४)**

(१) लोकशाहीचा गाभा म्हणजे ................ .

(अ) प्रौढ मताधिकार (ब) सत्तेचे विकेंद्रीकरण

(क) राखीव जागांचे धोरण (ड) न्यायालयीन निर्णय

(२) निवडणूक आयुक्तांची नेमणूक .............. करतात.

अ) राष्ट्रपती ब) प्रधानमंत्री

क) लोकसभा सभापती ड) उपराष्ट्रपती

(३) शिरोमणी अकाली दल हा पक्ष .............. या राज्यात आहे.

अ) ओडिशा ब) आसाम

क) पंजाब ड) जम्मू आणि काश्मिर

(४) लोकशाहीमध्ये .............. निवडणुकीत सामील होऊन सत्तेत प्रवेश करतात.

अ) राजकीय पक्ष ब) न्यायालये

क) सामाजिक संस्था ड) अशासकीय संस्था

**प्र.७ पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. (कोणतेही २) (गुण ४)**

(१) संविधानाचे स्वरूप एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते.

(२) एखाद्या घटकराज्यात केव्हा व किती टप्प्यात निवडणुका घ्याव्यात हे निवडणूक आयोग ठरवते.

(३) चळवळीला खंबीर नेतृत्वाची गरज नसते.

**प्र.८ (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा. (कोणत्याही २) (गुण ४)**


(१) सत्तेचे विकेंद्रीकरण

(२) मध्यावधी निवडणुका


(३) डावे उग्रवादी

**(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (कोणत्याही २) (गुण ४)**


(१) निवडणूक प्रक्रियेसंबंधीचा पुढील ओघतक्ता पूर्ण करा.




(२) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.



(३) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.




**प्र.९ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही २) (गुण ४)**

(१) निवडणूक आयुक्तपदाविषयी माहिती सांगा.

(२) सामाजिक न्याय प्रस्थापित करणे म्हणजे काय?

(३) पर्यावरण चळवळीचे कार्य स्पष्ट करा.

(४) राजकीय प्रक्रिया पारदर्शक होण्यासाठी कोणते प्रयत्न केले जातात?